# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ११२ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ दुपारी ०३:०० वा.

सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

**व्यवस्थापन परिषदेची ११२ वी (तातडीची) बैठक बुधवार, दि.०७ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी ०३:०० वाजता** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. प्र. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. नितीन आर. करमळकर - मा. प्र. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. एम. एम. माने | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. डी. डी. पुजारी, प्रभारी अधिष्ठाता, (वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) | सदस्य |
| ४) | डॉ. ए. ए. घनवट | सदस्य |
| .५) | डॉ. टी. एन. कोळेकर | सदस्य |
| ६) | डॉ. श्रीमती एस. आय. शेख | सदस्या |
| ७) | डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८) | डॉ. बी. सी. शेवाळे, वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| ९) | श्री. बी. पी. पाटील, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | कायम निमंत्रित |
| १०) | डॉ. जी. आर. मंझा, कुलसचिव | सदस्य सचिव |

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. ई. एन. अशोककुमार, प्रभारी अधिष्ठाता,(मानवविज्ञान विद्याशाखा) हे मुंबई येथे विद्यापीठाच्या कामासंदर्भात बैठकीस उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी पत्राद्वारे कळविले होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली. डॉ. एस. सी. मांडे, संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे यांनी ईमेलद्वारे व डॉ. डी. आर. नंदनवार, प्रभारी सहसंचालक, (तंत्र शिक्षण) पुणे मा. संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. मा. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] २३ जानेवारी, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

ठराव: २३ जानेवारी, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

[ ०२ ] **शै.वर्ष २०१७-१८ पासून घेण्यात येणाऱ्या Democracy, Elections and Good Governance (लोकशाही, निवडणूका व सुशासन) ह्या विषयाचे परीक्षा शुल्क ₹६०/- व पेपर तपासणीसाठी प्रती पेपर ₹०५/- इतके मानधन शिक्षकांना घ्यावयाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठीय मार्च / एप्रिल - २०१८ पासून घेण्यात येणाऱ्या Democracy, Elections and Good Governance (लोकशाही, निवडणूका व सुशासन) हा विषय शै. वर्ष २०१७-१८ पासून सर्व पदवी (All UG First Year-Sem-II) अभ्यासक्रमातील सत्र- २ मध्ये समाविष्ठ करण्यात आला असून उक्त विषय अभ्यासक्रमानुसार एकूण ३० गुणाचा असून वेळ ही ४५ मिनिट आहे.

सदरचा विषय पर्यावरणशास्त्रप्रमाणे घेण्यात येणार आहे. म्हणजेच विद्यार्थी ज्या महाविद्यालयात प्रवेशित आहे. त्या महाविद्यालयामध्येच या विषयाची परीक्षा होणार आहे. पर्यावरणशास्त्र या विषयास सुरुवातीस ₹६०/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे. त्याप्रमाणे लोकशाही, निवडणूका व सुशासन या विषयासाठी ₹६०/- शुल्क आकारण्यात यावे असे वाटते.

पर्यावरणाशास्त्र हा विषय एकूण ७० गुणाचा आहे. ७० गुणाच्या पेपरसाठी प्रती-पेपर तपासणीसाठी ₹१०/- इतके मानधन सद्यस्थितीत संबंधित शिक्षकांना दिले जात आहे. त्याअनुषंगाने लोकशाही, निवडणूका व सुशासन हा विषय एकूण ३० गुणाचा आहे. त्यासाठी पर्यावरणशास्त्र विषयाच्या आधारे प्रती-पेपर ₹५/- इतके मानधन सन २०१७-१८ पासून (मार्च-२०१८ पासून) संबंधित शिक्षकांना द्यावे असे वाटते.

Democracy, Elections and Good Governance ह्या विषयाचे परीक्षा शुल्क ६०/- व पेपर तपासणीसाठी प्रती-पेपर ₹५/- इतके मानधन शिक्षकांना द्यावयाची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(२) च्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने दिलेली मान्यता व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **शै.वर्ष २०१७-१८ पासून घेण्यात येणाऱ्या Democracy, Elections and Good Governance (लोकशाही, निवडणूका व सुशासन) ह्या विषयाचे परीक्षा शुल्क ₹६०/- व पेपर तपासणीसाठी प्रति पेपर ₹०५/- इतके मानधन शिक्षकांना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०३ ] **उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि.२०/०१/२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये दि.२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी श्री.वि. वा शिरवाडकर उर्फ कुसूमाग्रज यांचा जन्मदिन "मराठी भाषा गौरवदिन" म्हणून साजरा करण्याची व त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी एक नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि.२०/०१/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार दि.२७ फेब्रुवारी हा श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसूमाग्रज यांचा जन्मदिन मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याबाबतचे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

तसेच श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसूमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरवदिन" हा कशा प्रकारे साजरा करण्यात येणार आहे आणि या दिनी कोणते उपक्रम घेण्यात येणार आहेत, याबाबतची सविस्तर चर्चा करण्यासाठी सर्व विभागीय सहसंचालकांची व कुलसचिव सर्व विद्यापीठे यांची मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.०१/०२/२०१७ रोजी मुंबई येथे बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, निशा एंन्टरप्रायजेस या संस्थेला सोलापूर येथे येवून मराठी भाषेचा गौरव वाढविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याबाबत संधी द्यावी, असे ठरले. या संदर्भात निशा एंन्टरप्रायजेस यांनी दि.०१/०२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार कार्यक्रमासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून सोबत अवलोकनार्थ जोडले आहे. त्यानुसार या कार्यक्रमासाठी अंदाजित ₹६,७०,०००/- अधिक १८ टक्के GST इतका खर्च अपेक्षीत आहे आणि शासनाच्या दि.२०/०१/२०१८ रोजीच्या परिपत्रका नुसार सदर उपक्रम करण्यासाठी भाडे इत्यादिसाठी येणारा खर्च विद्यापीठांनी त्यांच्या निधीमधून करावा, असे निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त प्रमाणे दि.२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी निशा एंन्टरप्रायजेस यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याकरिता येणाऱ्या खर्चासाठी, त्यानुषंगाने आरक्षित करण्यात येणाऱ्या सभागृहाचे भाडे व इतर येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात तरतूद नसल्याने व नविन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे सन २०१७-१८ मध्ये मराठी भाषा गौरव दिन हे नवीन अंदाजपत्रक उघडून त्यामध्ये अपेक्षित खर्च ₹१०,००,०००/- च्या तरतूदीचे पुर्नविनीयोजन करता येईल.

| Registrar Office | | | | |
|---|---|---|---|---|
| Expenditure Side | | | | |
| Sr. No. | Budget Head | Original Provision ₹ | Reapropriation ₹ | Revised Provision ₹ |
| 1) | Security & Other Services | ₹1,50,00,000/- | -10,00,000/- | ₹1,40,00,000/- |
| 2) | Marathi Bhasha Gavrav Din | --- | +10,00,000/- | ₹10,00,000/- |

सबब, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि.२०/०१/२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये दि.२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसूमाग्रज यांचा जन्मदिन "मराठी भाषा गौरवदिन" म्हणून साजरा करण्याची व त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी वरील तक्त्याप्रमाणे अ. क्र. २) प्रमाणे एक नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि.२०/०१/२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये दि.२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी श्री.वि. वा शिरवाडकर उर्फ कुसूमाग्रज यांचा जन्मदिन "मराठी भाषा गौरवदिन" म्हणून साजरा करण्याची व त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी एक नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) मधील तरतूदीनुसार "विशेष कक्ष स्थायी समिती" मधील सदस्यांच्या नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी व त्यांना नियमानुसार असलेल्या विशेष सवलती योग्य प्रकारे उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने विद्यापीठात विशेष कक्ष स्थायी समितीचे गठण होणे आवश्यक आहे.

सदर समितीचे गठण शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) मधील तरतूदीनुसार तीन वर्षासाठी करावयाची असून, मागील दि.०१/०१/२०१५ ते ३१/१२/२०१७ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी गठित करण्यात आलेल्या समितीची मुदत दि.३१/१२/२०१७ रोजी संपत असल्याने, नव्याने दि.०१/०१/२०१८ ते ३१/१२/२०२० या तीन वर्षासाठी विशेष कक्ष स्थायी समिती गठित करावी लागणार आहे.

शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) प्रमाणे समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| i | The Vice-Chancellor | Ex-Office-Chairman |
| ii | 2-3 Professors | Members |
| iii | 3-5 Principals | Members |
| iv | 1-2 Readers | Members |
| v | 1-2 Lecturers | Members |
| vi | 2 women representative from teaching and non-teaching category | Members |
| vii | A representative of the State Government | Members |
| viii | The Deputy Registrar (Spl. Cell) | Members - Secretory |

The Members at Serial Nos. ii to vi are to be nominated by the Management Council.

Tenure: The tenure of members at Sr. No. ii to vi shall be three years.

उक्तप्रमाणे विशेष कक्ष स्थायी समिती गठीत करण्यासाठी अनुक्रमे ii to vi मधील सदस्यांचे नामनिर्देशन व्यवस्थापन परिषदेने करावयाचे असल्याने, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ ठेवणे आवश्यक आहे.

सबब, उक्तप्रमाणे दि.०१/०१/२०१८ ते दि.३१/१२/२०२० या तीन वर्षाच्या कालावधीसाठी विशेष कक्ष स्थायी समिती गठीत करण्यासाठी अनुक्रमे ii to vi बाबत नामनिर्देशनाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.**

**[ ०५ ] सन २०१५ च्या PET- ६ मधील विभागीय संशोधन समितीने वितरीत केलेल्या यादीतील एकूण १४३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: UGC Regulation - २००९ व विद्यापीठ अनुदान आयोगाची सन २०१५ ची दोन्ही पत्रे तसेच दि.२३ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र.१२ (६) च्या अनुषंगाने २०१५ साली झालेल्या विभागीय संशोधन समितीने वितरित केलेल्या यादीतील एकूण १४३ विद्यार्थ्यांपैकी ६५ विद्यार्थ्यांना प्रवेश देता येतो. PET- ६ मधील उर्वरित ७८ विद्यार्थ्यांनाही विभागीय संशोधन समितीने संशोधक मार्गदर्शक वितरित केले होते. परंतु UGC Regulation - २००९ व विद्यापीठ अनुदान आयोगाची सन २०१५ ची दोन्ही पत्रे तसेच दि.२३ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र.१२ (६) नुसार ज्या संशोधक मार्गदर्शकांच्या महाविद्यालयास संबंधित विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु नाही अशा मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरित करता येणार नाहीत. तसेच उपरोल्लोखित यादीतील वितरित केलेल्या एकूण १४३ विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांना वितरित केलेले संशोधक मार्गदर्शक हे येत्या वर्षभरात सेवानिवृत्त होत आहेत. तर काही संशोधक मार्गदर्शकांनी सेवेचा राजीनामा दिलेला असल्याने त्यांना ही विद्यार्थी वितरित करता येणार नाहीत. या परिस्थितीत २०१५ साली झालेल्या विभागीय संशोधन समितीने वितरित केलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना पीएच. डी. अभ्यासक्रमास प्रवेश देण्याकरिता खालीलप्रमाणे पर्यायांचा विचार होवू शकतो.

| | |
|---|---|
| १) | PET- ६ साठी ज्या संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्याकडील रिक्त विद्यार्थी संख्या (Vacancy) कळविली होती व त्यांना PET- ६ मध्ये विद्यार्थी वितरित होवूनही त्यांच्याकडे काही जागा शिल्लक राहतात. अशा संशोधक मार्गदर्शकांना काही विद्यार्थी वितरित करता येतील. |
| २) | PET- ६ साठी ज्या संशोधक मार्गदशकांनी त्यांच्याकडील रिक्त विद्यार्थी संख्या (Vacancy) कळविली नव्हती. तथापि त्यांच्या महाविद्यालयाकडे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहे व त्यांच्याकडे काही जागा शिल्लक राहतात. अशा संशोधक मार्गदर्शकांना काही विद्यार्थी वितरित करता येतील. |
| ३) | तसेच वरील पर्याय वापरुनही जर काही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत असतील तर अशा वेळी सन २०१५ नंतर म्हणजेच सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये ज्या शिक्षकांना नव्याने संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे आणि ज्यांच्या महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमास मान्यता आहे अशा मार्गदर्शकांना विद्यार्थी वितरित केल्यास दि.२३ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र.१२ (६) च्या अनुषंगाने सर्व १४३ विद्यार्थ्यांना पीएच. डी. अभ्यासक्रमास प्रवेश देणे शक्य होईल. |

उपरोक्त प्रमाणे पर्यायांचा विचार करावयाचा झाल्यास सर्व संबंधित विषयांच्या विभागीय संशोधन समितीच्या बैठकांचे स्वतंत्रपणे आयोजन करावे लागेल.

सबब, सन २०१५ च्या PET- ६ मधील विभागीय संशोधन समितीने वितरित केलेल्या यादीतील एकूण १४३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: सन २०१५ च्या PET- ६ मधील विभागीय संशोधन समितीने वितरीत केलेल्या यादीतील एकूण १४३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास व अ. क्र.१ ते ३ नुसार त्या-त्या विद्याशाखांचे अधिष्ठातांकडून संशोधक विद्यार्थी मार्गदर्शकांना वर्ग करण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिटट्यूट संचलित, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पंढरपूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्यासंदर्भात विद्या परिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिटट्यूट संचलित, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.१९/०१/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषी विद्यापीठाने त्यांच्या अखत्यारितील उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत कार्यवाही करण्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केले आहे. सदरील शासन निर्णयात खालीलप्रमाणे मुद्दे नमूद केले आहेत.

१) विद्यापीठांनी त्यांच्या अखत्यांरित कार्यरत असणाऱ्या व उत्कृष्ट उच्च शैक्षणिक सेवा देणाऱ्या १०% महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत कार्यवाही करावी.

२) विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जी महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभागास स्वायत्तता (Autonomy) प्रदान करण्याच्या दृष्टीने सक्षम आहेत, अशा महाविद्याये / संस्था / विद्यापीठ विभागांना उद्युत करुन त्या शिक्षण संस्थांचे प्रस्ताव विद्यापीठ स्तरावरुन सर्व निकषांची तपासणी करुन विद्यापीठ प्राधिकरणाच्या मान्यतेने आवश्यकते प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावे.

३) महाविद्यालयांना स्वायत्त देण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनानुसार विद्यापीठांना त्यांच्या परिनियम अद्यावत केले नसल्यास सदर परिनियम विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनानुसार प्रथम विद्यापीठांचे परिनियम अद्यावत करण्याबाबतची कार्यवाही करावी.

४) विद्यापीठांनी त्यांच्या अखत्यांरितील उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. राज्यपाल तथा कुलपती यांना सादर करावा.

तसेच दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाने दि.२३/०२/२०१७ रोजीच्या राजपत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा कायदा दि.०१/०३/२०१७ पासून अंमलात आणला असून त्यातील कलम १२२ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

स्वायत्त दर्जा मिळविण्यासाठी, विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विद्यापीठाकडे अर्ज करता येईल. व्यवस्थापन परिषदेस, विद्या परिषदेच्या शिफारशीवरुन स्वायत्त दर्जा प्रदान करता येईल.

स्वायत्त दर्जा मिळविण्याकरिता दि.१५/११/२०१७ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत ठराव क्र.४८ अन्वये विद्या परिषदेने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिटट्यूट संचलित, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्यासंदर्भात विद्या परिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिटट्यूट संचलित, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पंढरपूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्यासंदर्भात विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०७ ] **विद्यापीठ परिसरातील विविध बांधकाम करणे या कामाकरिता दि.०७/०२/२०१८ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरात करावयाच्या बांधकामाबाबत बांधकाम समितीची बैठक दि.०७/०२/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस विषय क्र.१ ते ५ व आयत्या वेळेचे विषय क्र.६(१) ते ६(३) नुसार एकूण आठ विषय सादर करण्यात आले असता, बांधकाम समितीच्या बैठकीतील ठराव क्र.१ ते ५ व आयत्या वेळेचे विषयांचे ठराव क्र.६(१) ते ६(३) नुसार व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस्तव शिफारस करण्यात आली आहे.

सबब, दि.०७/०२/२०१८ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

ठराव: **विद्यापीठ परिसरातील विविध बांधकाम करणे या कामाकरिता दि.०७/०२/२०१८ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ] श्री. महेश दिगंबर पवार यांना वाहनचालक या पदावर नियुक्ती केल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दि.२३/०१/२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये श्री. महेश दिगंबर पवार यांच्या प्रकरणाचा आढावा घेवून अहवाल सादर करण्यासाठी प्रा. एम. एम. माने, व्यवस्थापन परिषद सदस्य व प्रा. डॉ. ए. ए. घनवट, व्यवस्थापन परिषद सदस्य यांची समिती गठीत केली होती. सदर समितीने खालील प्रमाणे शिफारस केली आहे.

"सद्यस्थितीत मा. न्यायाधिकरणाने अपील क्र.७/२०१६ या प्रकरणामध्ये दि.३०/०९/२०१६ रोजी दिलेला निकाल अस्तित्वात असल्याने, त्यानुसार श्री. शिरीष बंडगर हे कनिष्ठ लिपिक या पदी रुजू झाल्याने रिक्त झालेल्या वाहन चालक या पदावर खुल्या प्रवर्गातून श्री. महेश दिगंबर पवार यांना परिविक्षाधिन कालावधीमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र.१२३३०/२०१७ च्या व मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या मान्यतेच्या अधिन राहून रुजू करुन घ्यावे, जेणे करुन विद्यापीठाला नियमित वाहन चालकाचे एक पद उपलब्ध होईल. या कारणास्तव वरीलप्रमाणे प्रस्तूत समिती शिफारस करीत आहे".

सदर समितीच्या शिफारशीनुसार दि.०३/०२/२०१८ रोजीच्या मा.कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने श्री. महेश पवार यांना पत्र क्र.सोविसो / आस्था / नियुक्ती आदेश / २०१८ / ९७४, दि.०३/०२/२०१८ अन्वये, वाहन चालक या पदाचे नियुक्ती आदेश पारित करण्यात आले असून ते वाहन चालक या पदावर दि.०५/०२/२०१८ रोजी कार्यालयीन वेळेत रुजू झाले आहेत.

सबब, श्री. महेश दिगंबर पवार यांना वाहनचालक या पदावर नियुक्ती केल्याची बाब माहितीस्तव).

ठराव: **श्री. महेश दिगंबर पवार यांना वाहनचालक या पदावर नियुक्ती केल्याच्या बाबीची नोंद घेण्यात आली.**

[ ०९ ] **दि.२७/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.१६/११/२०१७ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१६/११/२०१७ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.२७/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.१६/११/२०१७ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **दि.१६/११/२०१७ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने दि.२७/११/२०१७ च्या बैठकीत केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ १० ] **दि.०७/०२/२०१८ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.०७/०२/२०१८ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.०७/०२/२०१८ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.०७/०२/२०१८ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.०७/०२/२०१८ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **दि.०७/०२/२०१८ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने दि.०७/०२/२०१८ च्या बैठकीत केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ] विद्यापीठाकडील शार्प / कोनिका मिनोल्टा कंपनीच्या कॉपीयर मशीनच्या वार्षिक सेवा कराराची (ASC) बाब विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाकडील आस्थापना विभाग - (१ नग), परीक्षा विभाग - (४ नग शार्प व १ नग कोनिका मिनोल्टा), ग्रंथालय विभाग - (१ नग), मा. कुलगुरु कार्यालय - (१ नग), सामाजिकशास्त्र संकुल - (१ नग) व कौशल्य विकासकेंद्र - (१ नग) अशी एकूण ९ शार्प कंपनीच्या कॉपीयर मशीन व १ नग कोनिका मिनोल्टा कंपनीच्या कॉपीयर मशीन असून सदर मशीनसाठी सोलापूर शहरातील शार्प व कोनिका मिनोल्टा कंपनीचे अधिकृत विक्रेते व सर्व्हिस सेंटर आय. पी. एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्याबरोबर यापूर्वी दि.१५/१२/२०१६ ते १४/१२/२०१७ पर्यंत वार्षिक सेवा करार (ASC) करण्यात आलेला होता. सदरचा करार दि.१५/१२/२०१७ पासून संपलेला असल्याने संबंधित विभागास मशीनचा वार्षिक सेवा करार (ASC) बाबत विचारणा केला असता, वरीलप्रमाणे संबंधित विभागाने वार्षिक सेवा (ASC) करार करण्याबाबत कळविलेले आहे. करारापोटी प्रति मशीन रक्कम ₹६,०००/- + १८% GST (एकूण ९ नग शार्प कंपनी) व प्रति मशीन ₹१०,०००/- + १८% GST (१ नग कोनिका मिनोल्टा कंपनी) या प्रमाणे १० मशीनसाठी रक्कम ₹६४,०००/- + १८% GST प्रमाणे आदा करावी लागणार आहे. सोबत अधिकृत विक्रेते मे. आय. पी. एंटरप्राईजेस, सोलापूर यांचे पत्र जोडलेले आहे.

करार करण्यासंदर्भातील विषय दि.२३/०१/२०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ ठेवला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

ठराव: सदरच्या विषयातील तारखा तपासून प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावे असे सर्वानुमते ठरले.

याबाबत पुनश्च: सादर करण्यात येते की, मे. आय. पी. एंटरप्राईजेस यांनी त्यांच्या पत्रामध्ये कराराचा कालावधी दि.१५/१२/२०१७ ते दि.१४/१२/२०१८ असा नमूद केला आहे. तथापि याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता झाल्यानंतरच त्या तारखेपासून विभागाकडून करार करण्याची कार्यवाही करण्यात येते. मे. आय. पी. एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्याकडून करार संदर्भातील सुधारित पत्र प्राप्त झाले असून सोबत अवलोकनार्थ सादर.

१) मे. आय. पी. एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्यासोबत मान्यतेनंतर कराराची कार्यवाही करण्यास मान्यता असावी.

२) तसेच वार्षिक करारापोटी शार्प कंपनीचे प्रति मशीन ₹६,०००/- + १८% GST प्रमाणे ९ व कोनिका मिनोल्टा कंपनीचे प्रति मशीन ₹१०,०००/- + १८% GST सहीत एकूण रक्कम ₹७५,५२०/- Common Services and General Charges : Servicing and Maintenance of Copier (Budget Provision: ₹१,००,०००/-) या अंदाजपत्रकीय शिर्षकाच्या तरतूदीतून खर्ची टाकण्यास मान्यता असावी.

३) त्याचप्रमाणे मशिनरीसाठी लागणारे पार्टस् व टोनर हे कंपनीच्या दराप्रमाणे मे. आय. पी. एंटरप्राईजेस, सोलापूर हे अधिकृत विक्रेते असल्याने त्यांच्याकडून प्रत्यक्ष खरेदी करण्यास मान्यता असावी.

सबब, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या पुनश्च: विचारार्थ).

**ठराव:** **विद्यापीठाकडील शार्प / कोनिका मिनोल्टा कंपनीच्या कॉपीयर मशीनच्या वार्षिक सेवा करार (ASC) करण्यास खालील दिल्याप्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**१) मे. आय. पी. एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्यासोबत मान्यतेनंतर कराराची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**

**२) तसेच वार्षिक करारापोटी शार्प कंपनीचे प्रति मशीन ₹६,०००/- + १८% GST प्रमाणे ९ व कोनिका मिनोल्टा कंपनीचे प्रति मशीन ₹१०,०००/- + १८% GST सहीत एकूण रक्कम ₹७५,५२०/- Common Services and General Charges : Servicing and Maintenance of Copier (Budget Provision: ₹१,००,०००/-) या अंदाजपत्रकीय शिर्षकाच्या तरतूदीतून खर्ची टाकण्यास मान्यता देण्यात आली.**

**३) त्याचप्रमाणे मशिनरीसाठी लागणारे पार्टस् व टोनर हे कंपनीच्या दराप्रमाणे मे. आय. पी. एंटरप्राईजेस, सोलापूर हे अधिकृत विक्रेते असल्याने त्यांच्याकडून प्रत्यक्ष खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] विद्यापीठाचे सन २०१७-१८ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१८-१९ चे मूळ अर्थसंकल्प विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३३ (१) नुसार विद्यापीठाचे सन २०१७-१८ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१८-१९ चे मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरिता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. डी. डी. पुजारी | अध्यक्ष |
| २) | डॉ. ए. ए. घनवट | सदस्य |
| ३) | श्रीमती एम. डी. कुलकर्णी (CA) | सदस्य |
| ४) | डॉ. जी. आर. मंझा | निमंत्रित सदस्य |
| ५) | डॉ. बी. सी. शेवाळे | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.१५, १६, १७ व दि.१८/०१/२०१८ रोजी सर्व विभाग व संकुलप्रमुख यांच्यासमवेत बैठक घेवून अर्थसंकल्पीय मसुद्यावर त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. तसेच मागील तीन वर्षाची व चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा - खर्च तसेच पुढील वर्षातील होणारी जमा व खर्चाचे नियोजन व उपलब्ध निधी इत्यादीचा आढावा घेवून सदर अर्थसंकल्पीय उपसमितीने सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अर्थसंकल्पाचा मसूदा तयार करुन वित्त व लेखा समितीच्या दि.०७/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.०२ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होवून त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | सन २०१७-१८ च्या सुधारित अर्थसंकल्प व सन २०१८-१९ च्या मूळ अर्थसंकल्प दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचे सन २०१७-१८ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१८-१९ च्या मूळ अर्थसंकल्प वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठाचे सन २०१७-१८ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०१८-१९ चे मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस दुरुस्तीसह शिफारस करण्यात आली.**

**[ १३ ] मा. संचालक, भूशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी भूशास्त्र, पर्यावरणशास्त्र व भूमाहितीशास्त्र या विषयामधील गरजूंसाठी मार्गदर्शन सेवा (Consultancy Policy) पुरविण्याकरिता तयार करण्यात आलेले शुल्क व नियमावली विचारार्थ.**

(टिपणी: मा. संचालक, भूशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी भूशास्त्र, पर्यावरणशास्त्र व भूमाहितीशास्त्र या विषयातील गरजूंसाठी मार्गदर्शन सेवा (Consultancy Policy) तयार करण्यात आली आहे. सदर सेवा जे कोणी घेतील त्यांच्याकरिता शुल्क आकारले जाईल. सदर मार्गदर्शनाच्या विविध कामास शुल्क आकारण्यासाठी विनियमित करण्यात आले असून त्याचा तक्ता (Consultancy Policy) सोबज जोडला आहे.

उपरोक्त प्रमाणे भूशास्त्र, पर्यावरणशास्त्र व भूमाहितीशास्त्र या विषयातील गरजूंसाठी (Consultancy Policy) सेवा पुरविण्याकरिता भूशास्त्र संकुलाकडून जे शुल्क विनियमित करण्यात आले आहे ते वित्त व लेखा समितीच्या दि.०७/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.३ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होवून त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.३ | भूशास्त्र, पर्यावरणशास्त्र व भूमाहितीशास्त्र या विषयातील गरजूंसाठी (Consultancy Policy) सेवा पुरविण्याकरिता भूशास्त्र संकुलाकडून जे शुल्क विनियमित करण्यात आले आहे त्यास वित्त व लेखा समितीच्या वतीने मान्यता देण्यात आलेली आहे. |

सबब, भूशास्त्र, पर्यावरणशास्त्र व भूमाहितीशास्त्र या विषयातील गरजूंसाठी (Consultancy Policy) सेवा पुरविण्याकरिता भूशास्त्र संकुलाकडून जे शुल्क विनियमित करण्यात आलेले असून त्यास वित्त व लेखा समितीच्या वतीने मान्यता देण्यात आलेली असून सदर समितीची शिफारस विचारार्थ).

ठराव: **मा. संचालक, भूशास्त्र संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी भूशास्त्र, पर्यावरणशास्त्र व भूमाहितीशास्त्र या विषयामधील गरजूंसाठी मार्गदर्शन सेवा (Consultancy Policy) पुरविण्याकरिता तयार करण्यात आलेले शुल्क व नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] अध्यक्ष, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जाधववाडी, ता. माळशिरस यांनी नवीन महाविद्यालयाच्या प्रस्तावाच्या जागेसंदर्भातील संस्थेची जमिन जागा एकाच ठिकाणी असल्याचे हमीपत्र, संस्थेच्या इमारतीचा नकाशा, संस्थेचा प्रकल्प अहवालसंदर्भातील फोटो इत्यादी कागदपत्रे दि.१६/०१/२०१८ रोजीच्या पत्रासोबत जोडून सादर केलेली विनंती व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: सदरील पत्रान्वये शै. वर्ष २०१८-१९ च्या बृहत आराखड्यानुसार आमचे शैक्षणिक संस्थेच्या वतीने नवीन कला व विज्ञान महाविद्यालय जाधववाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे नवीन महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव दि.१८/११/२०१७ त्रुटी पत्रातील संदर्भानुसार आपल्या कार्यालयाकडे सादर केला होता. तरी आम्ही पुन्हा त्रुटी प्रस्ताव आपल्याकडे योग्य कागदपत्र पुराव्यासह प्रस्ताव सादर करीत आहोत. त्याचा स्विकार करुन सहानुभूतीपूर्वक विचार करावा, ही विनंती असे पत्रात नमूद केलेले आहे.

**याबाबत सादर करण्यात येते की,**

१) शै. वर्ष २०१८-१९ पासून सुरु करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयाकरिता इरादापत्रासाठी उपरोक्त संस्थेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विद्यापीठ स्तरावर योग्य ती कार्यवाही करुन सदरील पात्र झालेला प्रस्ताव दि.३०/११/२०१७ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सादर केलेला आहे.

२) मा. अध्यक्ष, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जाधववाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी दि.१८/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अपिलाअंती त्रुटीपूर्तता दि.२७/११/२०१७ रोजी पत्र उशीरा मिळाले असल्याच्या कारणास्तव सादर करण्यात आलेले होते. सदरील त्रुटीपूर्तता मा. कुलगुरु महोदय यांचे अपिलाअंती मान्यतेस्तव सादर करण्यात आला असून, प्रस्ताव अपात्र केलेला आहे. यास्तव सदरील संस्थेस अपात्रता संदर्भात कळविले आहे.

३) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने, राजपत्र असाधारण भाग चार दि.२८/११/२०१७ नुसार सन २०१७ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.६ च्या कलम १०९ ची सुधारणा करुन लागू केलेला आहे. (सोबत जोडला आहे)

४) त्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांच्या दि.३०/११/२०१७ रोजीच्या ईमेलद्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मध्ये सुधारणा केलेली कळविले असून, त्यानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात मा. कुलगुरु महोदय यांना दि.०८/१२/२०१७ रोजीची टिपणी सादर केली असता, महाराष्ट्र राज्य शिक्षण व विकास आयोगाची (माहेड) बैठक दि.२९/११/२०१७ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतामध्ये सोलापूर विद्यपीठाचा १३ बिंदू (स्थान) मध्ये समावेश नाही. यास्तव “Noted“ असे पृष्ठांकन केलेले आहे. त्यापुढील कार्यवाही केलेली नाही.

५) नवीन प्राप्त होणाऱ्या इरादापत्राचे प्रस्तावाकरिता मुदत वाढवून ती दि.१५/०१/२०१८ पूर्वी सादर करणे विषयी दि.२८/११/२०१७ रोजीच्या राजपत्रान्वये मुद्दा क्र.५ नुसार मान्यता दिलेली आहे. सदरची बाब माहितीस्तव (सोबत महाराष्ट्र शासन राजपत्र जोडले आहे.)

६) भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जाधववाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी जाधववाडी येथील प्रस्तावित नवीन महाविद्यालय इरादापत्रासाठी परिशिष्ट "ब" वरील मुद्या क्र.१३ (२) (ड) करिताच्या जागेसंदर्भात १४ व १७ या अटीची पूर्तता करण्याकामी पुनश्च: विनंती करण्यात आलेली आहे.

सबब, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जाधववाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांचे कला व विज्ञान महाविद्यालय, जाधववाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर नवीन महाविद्यालयाचा अपिलाअंती संस्थेनी सादर केलेल्या अपिलाची कार्यवाही संपुष्टात येवून प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेले आहेत. दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद केलेल्या तरतूदीनुसार विहित कालमर्यादित प्रस्ताव सादर करणे आवश्यक असल्याने सदरील संस्थेची अपिलाकरिता प्राप्त त्रुटी पुर्तता पुन:श्च सादर केलेली विनंती उपरोक्त प्रमाणे केलेली विनंती व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

ठराव: **भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जाधववाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांचे कला, विज्ञान नवीन महाविद्यालयासंदर्भातील अपिलाअंती संस्थेकडून पुनश्च: सादर केलेल्या प्राप्त त्रुटीपूर्ततेची विनंती मान्य करुन (त्रुटीपूर्ततेसह) अपात्र प्रस्ताव शासनास पाठविण्याकामी सर्वानुमते शिफारस करण्यात आली.**

**तसेच विद्यापीठ स्तरावरील दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेले इतर चार प्रस्तावित खालील नवीन महाविद्यालयाचे (इरादापत्र) चे अपात्र प्रस्ताव (त्रुटीपूर्ततेसह) शासनास पाठविण्याकामी सर्वानुमते शिफारस करण्यात आली.**

**१. सावित्रीबाई फुले महिला खादी गामोद्योग व बहुउद्देशीय संस्था, बार्शी, जि. सोलापूर यांचे संचलित स्व. तुकाराम भाऊ डिसले कला व विज्ञान महाविद्यालय, सासुरे फाटा, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर.**

**२. चंद्रभागा विद्या विकास मंडळ चळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांचे संचलित श्री. भास्कर आप्पा गायकवाड वरिष्ठ महाविद्यालय, चळे (कला, वाणिज्य व विज्ञान).**

**३. श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर यांचे संचलित लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय, वडाळा, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर.**

**४. शिवरत्न शिक्षण संस्था, शंकरनगर- अकलूज, ता माळशिरस, जि. सोलापूर यांचे संचलित शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी, शंकरनगर-अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर.**

मा. प्र. कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| सदस्य सचिव | अध्यक्ष |
| व्यवस्थापन परिषद | व्यवस्थापन परिषद |